| MHAU060005532026 | फौजदारी किरकोळ अर्ज/७०/२०२६<br>कन्नड ग्रामीण<br>**जयलाल मगन राठोड वि.. महाराष्ट्र शासन** |
|---|---|

## <u>निशाणी १ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार याने त्याचे वाहन त्याला परत मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे मालकीची अर्जात नमूद ट्रॅक्टर क्रमांक MH-20-FY-0452 असुन इंजिन क्रमांक NMC6CAE0213 व चेसिस क्रमांक MBNADANBAMNC02950 हा आहे. ते सदर ट्रॅक्टर व ट्रॉली कन्नड ग्रामीण पोलीस ठाणे, यांनी गुन्हा रजिष्टर नं.५०/२०२६ चे कामी जप्त केले आहे. ते वाहन कन्नड ग्रामीण पोलीस ठाणे यांच्या ताब्यामध्ये असून त्यांचे आवारात पडून राहिलेस त्याचे नुकसान होणार आहे. सदरचे वाहनाची अर्जदार यांना दैनंदीन कामासाठी आवश्यकता आहे. सबब, योग्य ते बंधपत्र घेवून अर्जदाराने वाहनाचा ताबा मागितला आहे.

३. प्रस्तुत अर्जास सहा. सरकारी वकील यांनी आपले म्हणणे मांडून अर्जास विरोध केला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, सदर गुन्हा गंभीर स्वरुपाचा असून तपासकाम प्राथमिक टप्यात आहे. सदर गुन्हा राज्य सरकारच्या मालकीच्या वाळू चोरीशी संबंधित आहे. त्यामुळे, सदर गुन्हा खाण आणि खनिज कायद्याअंतर्गत येतो. त्याअंतर्गत कलम २१ (४अ) नुसार वाहन जप्त करण्यास पात्र आहे. महसुल अधिकारी हे दंड आणि इतर आवश्यक कारवाईबाबत पुढील कार्यवाही करण्यासाठी समक्ष अधिकारी आहेत. त्यांचे म्हणणे मागवून त्याचा विचारण करणे गरजेचे आहे. गुन्हयामध्ये आरोपीचा सहभाग आहे हे प्रथमदर्शनी दिसून येते, कारण

वाहनाच्या मालकाबाबत तक्रार देण्यात आलेली आहे. गुन्हा करत असताना आरोपीकडून सदर वाहन जप्त करण्यात करण्यात आलेले आहे. सदरच्या वाहनाने आरोपीने गंभीर गुन्हा केलेला आहे. सदरचे वाहन गुन्ह्यामधील महत्वाचा पुरावा आहे. प्रकरण चालू असताना सदरच्या वाहनाची आवश्यकता लागेल. त्यामुळे, वाहन अर्जदार याला परत दिल्यास वाहनाच्या स्वरुपात बदल होण्याची दाट शक्यता आहे. तसेच वाहन परत दिल्यास अशा प्रकारचा गुन्हा पुन्हा परत होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे, अर्ज नामंजूर करावा अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच तपासिक अधिकारी यांनी अर्जदारास वाहन परत देण्यात येवू असे त्यांनी सांगितले.

४. युक्तीवाद ऐकला. अर्जदार याने त्याच्या अर्जाचे पृष्ठ्यर्थ आर.सी.बुक, एफ.आय.आर.ची प्रत, तसेच अर्जदाराचे आधारकार्ड सोबत असे कागदपत्र दाखल केलेले आहेत. त्यावरुन ही बाब स्पष्ट होते की, अर्जदार हे जप्त वाहनाचे मालक आहेत. तसेच कन्नड ग्रामीण पोलीस ठाणे यांनी सुध्दा त्यांच्याकडून सदरचे वाहन जप्त केलेले आहे. सदरचे वाहन त्यांचे कार्यालयात पडून राहिल्यास त्याचे मुल्य नक्कीच कमी होईल. त्यामुळे, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये त्या वाहनाचा अंतरिम ताबा अर्जदारास दिला जावू शकतो. त्यामुळे, योग्य त्या अटी व शर्ती अर्जदार यांचेवर लादून तसा ताबा देता येतो. वरीलप्रमाणे चौकशी केली असता माझे समाधान झाले आहे की, अर्जदार हे जप्त वाहन ताबेमध्ये देण्यास योग्य व्यक्ती आहेत. त्यांना त्या वाहनाची वैयक्तीक व घरगुती कामाकरीता गरज आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. अर्जदार याला असे निर्देशित करणेत येते की, त्याने रक्कम रु.८,००,०००/– (आठ लाख रुपये मात्र) चे बंधपत्र खालील अटी शर्तीस आधीन राहून करुन घ्यायचे आहे.

अ. अर्जदार याने न्यायालय जेव्हा निर्देशित करेल तेव्हा अर्जात नमूद जप्त वाहन न्यायालयात हजर करावयाचे आहे.

ब. अर्जदार याने जप्त वाहनामध्ये कोणताही बदल अथवा परिवर्तन करावयाचे नाही.

क. अर्जदार याने जप्त वाहन सदर खटल्याचा अंतिम निकाल होईपर्यंत कोणासही विकावयाचे नाही.

ड. यात कसूर केल्यास सदरचे बंधपत्र सरकार जमा करणेत येईल.

३. पोलिसांनी संबंधित वाहनाचे विविध कोनांमधून रंगीत छायाचित्रे काढून, तसा पंचनामा करुन तो पंचनामा गुन्ह्याचे कामी अंतिम अहवालासोबत दाखल करावयाचा आहे.

४. सदर सुपूर्तनामा बंधपत्र हे न्यायदंडाधिकारी यांचे आदेशानुसार केलेले असलेमुळे महाराष्ट्र न्यायालयीन शुल्क अधिनियम, १९५९ चे परिशिष्ठ २, नंबर ९ प्रमाणे रक्कम रु.१०/– न्यायालयीन शुल्क लावून सादर करावयाचे आहे.

५. सदरचे प्रकरण हे कन्नड ग्रामीण पोलिस स्टेशन गुन्हा रजिष्टर नं.५०/२०२६ ला अनुसरुन दाखल होणा–या अंतिम अहवालासोबत ठेवावयाचे आहे.

६. प्रस्तुत प्रकरण ई–फायलिंगप्रणालीद्वारे दाखल असल्यामुळे

बंधपत्राची पुर्तता अर्जदारने ई–फायलिंगने करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2026.03.12 17:55:43 +0530

कन्नड. (वि. द. पाटील)

दिनांक : १२/०३/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

कन्नड.

*****

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | V. D. Khambat, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kannad |
| Date | : | 12/03/2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 12/03/2026 |
| Order uploaded on | : | 12/03/2026 |